# ६. सिविराजचरियं

**प्रस्तावना**

प्रस्तुत पद्य पाठ सुत्तपिटकाच्या खुद्दक निकायातील चरिया पिटक या ग्रंथातून घेतला आहे. यामध्ये दान, शील, सहनशीलता, प्रज्ञा, विर्य, शांती, सत्य, अधिष्ठान, मैत्री व उपेक्षा या दहा पारमिताचे वर्णन आहे. पारमिता म्हणजेच पूर्णत्व. पारमिता पूर्ण केल्याशिवाय कोणतीही व्यक्ती बुद्धत्व प्राप्त करू शकत नाही.

या ग्रंथाच्या अध्ययनाने पारमिता पूर्ण करण्याची प्रेरणा मिळते. सांसारिक जीवनापासून मुक्त होण्याची भावना जागृत होते. त्याचप्रमाणे कठीण कार्य करण्याचे, संकटांना तोंड देण्याचे, सुख दुक्खात न डगमगता समभाव ठेवण्याचे धैर्य प्राप्त होते.

समाजात दानशूर लोक अनेक असतात. परंतु अंधत्वाची तमा न बाळगता जाणीवपूर्वक नेत्रदान करणाऱ्या सिविराजाचा संकल्प व दृढनिश्चय या पद्यात सांगितलेला आहे.



अरिट्ठसव्हये नगरे, सिविनामासि खत्तियो ।<br>
निसज्ज पासादवरे, एवं चिन्तेस'हं तदा ।।१।।

यं किञ्चि मानुसं दानं, अदिन्नं मे न विज्जति।<br>
यो पि याचेय्य मं चक्खुं, ददेय्य अविकम्पितो ।।२।।

मम सङ्कप्पमञ्ञाय, सक्को देवानमिस्सरो ।
निसिन्नो देवपरिसाय, इदं वचनमब्रवि ।।३।।

निसज्ज पासादवरे, सिविराजा महिद्धिको ।
चिन्तेन्तो विविधं दानं, अदेय्यं सो न पस्सति ।।४।।

पवेधमानो फलित सिरो, वलिगत्तो जरातुरो ।
अन्धवण्णो'व हुत्वान, राजानं उपसङ्कमि ।।५।।

याचामि तं महाराज, धम्मिकं रट्ठवड्ढनं।
तव दानरता, कित्ति उग्गता देवमानुसे ।।६।।

उभो'पि नेत्ता नयना, अन्धा उपहता मम ।
एकं मे नयनं देहि त्वं' पि एकेन यापथ ।।७।।

इदानाहं चिन्तयित्वा न, पासादतो इधागतो ।
त्वं मम चित्तमञ्ञाय, नेत्तं याचितुं आगतो ।।८।।

अहो मे मानसं सिद्धं, सङ्कप्पो परिपूरतो ।
अदिन्नपुब्बं दानवरं, अज्ज दस्सामि याचके ।।९।।

एहि सीवक उट्ठेहि, मा दन्धहि मा पवेधयि।
उभो पि नयनं देहि, उप्पाटेत्वा वनिब्बके ।।१०।।

ददमानस्स देन्तस्स, दिन्नदानस्स मे सतो ।
चित्तस्स अञ्ञथा नत्थि, बोधिया येव कारणा।।११।।

न मे देस्सा उभो चक्खू, अत्ता न मे न देस्सियो।
सब्बञ्ञुतं पियं मय्हं, तस्मा चक्खुं अदासहं' ति ।।१२।।

**(चरियापिटक)**

---

## शब्दार्थ

**सव्हय (ना.)** – नाव
**अञ्ञाय (अ.)** – जाणून
**मा (ना.)** – नको
**वणिब्बके** – याचकामध्ये
**सब्बञ्ञुता (स्त्री.)**– सर्वज्ञता
**चक्खू (नपु.)** – डोळे
**अन्धवण्ण (पु.)** – आंधळा
**अविकंपित (वि.)** – न थरथरता, न घाबरता
**पवेधमान (वि.)** – कंप पावणारा
**दन्ध (क्रि.)** – घाबरणे
**बोधि** – उत्कृष्ट ज्ञान
**उप्पाटेत्वा (क्रि. पू. अ.)** – काढून, उपटून
**कतंजलि (वि.)** – हात जोडणे
**रट्ठवड्ढनं (वि.)**– राष्ट्रवर्धन

## स्वाध्याय

### १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सिवीराजाच्या नगराचे नाव काय होते ?

२) सिविराजाने दानासंबंधी कोणता विचार केला ?

३) शुक्राने सिविराजाला कशाचे दान मागितले ?

४) सिविराजाने शिवकाला काय सांगितले ?

५) दान देत असताना सिवीराजाच्या मनात कोणता विचार उत्पन्न झाला ?

६) सिविराजाने पूर्वी न दिलेल्या दानापैकी कोणते दान दिले ?

### २. खालील वाक्यांचे सत्य / असत्य लिहा.

१) यं किञ्चि मानुसं दानं दिन्नं मे न विज्जति ।

२) अन्धवण्णो व हुत्वान राजानं उपसङ्कमि ।

३) द्वे मे नयनं देहि त्वम्पि एकेन यापथ।

४) अदिन्नपुब्बं दानवरं अज्ज दस्सामि याचके ।

५) न म देस्सा उभो चक्खू अत्ता न मे न देस्सियो ।

### ३. खालील प्रश्नांची सूचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.

१) यो पि याचेय्य मं .........ददेय्यं अविकम्पितो। (चक्खुं/नेत्त) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा

२) एक मे .......... देहि त्वं पि एकेन यापथ । (नयनं/चक्खू) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा

३) पवेधमान (माध्यम भाषेत अर्थ लिहा)

४) वनिब्बके (माध्यम भाषेत अर्थ लिहा)

५) उभोपि (संधी विग्रह करा)

६) इदानाहं (संधी विग्रह करा)

### ४. संधी करा –

१) सो + अपि

२) इदानि + अहं

३) चिन्तेसि + अहं

४) अदासि + अहं

## ५. अव्यय लिहा.




## ६. जाळरेखाचित्र पूर्ण करा.

१)




२)




## ७. दीर्घोत्तरी प्रश्न.

१) सिविराजाचे जीवन चरित्र लिहा.

२) सिविराजाने दान पारमिता कशी पूर्ण केली त्याचे वर्णन करा.

☆☆☆